महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक

विभागीय क्रीडा संकुल परिसर, (वसतिगृह इमारतीजवळ),सर्व्हे नं.१९५,मुंबई-आग्रा महामार्ग, हिरावाडी रोड, पंचवटी,नाशिक
इ-मेल-dsonashik.dsys-mh@gov.in /dsonashik2013@gmail.com/website-www.nashiksports.com
(पिन-४२२ ००३) दूर. क्र.- (०२५३)-२५७७७१९

जाक्र.**७३८**/जिक्रीअ/राज्यक्रीस्प/शालेयग्रॅपलींग/आयो/२०२४-२५/का-७ दि. ०१.०१.२०२५

प्रति,

मा. जिल्हा क्रीडा अधिकारी ( सर्व ),
महाराष्ट्र राज्य.

**विषय – राज्यस्तरीय शालेय ग्रॅपलींग क्रीडा स्पर्धा आयोजन (सन-२०२४-२५).**

( वयोगट – १९ वर्षाआतील – मुले व मुली )

संदर्भ :- १.मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. क्रीयुसे/शाक्रीस्प/आयोजन/२०२४-२५/का-४/८६४,दि. ०४ जुलै, २०२४ रोजीचे पत्र.
२. अध्यक्ष, ग्रॅपलींग असो. ऑफ महाराष्ट्र यांचेकडील क्र.जी.क्री.अ. ११/१२-२०२४, दि.३०.१२.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने तथा जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक व्दारा व ग्रॅपलींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय ग्रॅफ्लींग (१९ वर्षाआतील मुले व मुली ) क्रीडा स्पर्धा आयोजन पुढीलप्रमाणे नाशिक येथे करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

## राज्यस्तरीय शालेय ग्रॅपलींग क्रीडा स्पर्धा कार्यक्रम – ( १९ वर्ष - मुले व मुली )

| राज्यस्तरीय शालेय ग्रॅपलींग क्रीडा स्पर्धा – सन – २०२४-२५ | | | |
|---|---|---|---|
| १. | खेळ प्रकार व वयोगट | - | ग्रॅफ्लींग – (१९ वर्षाआतील मुले व मुली ) |
| २. | स्पर्धा कालावधी | - | दि. १७ ते १८ जानेवारी, २०२५ या कालावधीत. |
| ३. | संघ/खेळाडूंची उपस्थिती वेळ व दिनांक | - | दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी-१२.३० वाजेपर्यंत. |
| ४. | वजनास सुरुवात | - | दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी-०१.०० ते ०५.०० वा. पर्यंत.<br>संपर्क क्रमांक – श्री. संदीप बोरसे-७७०९४१०३४७<br>श्री. सागर बोरसे-८८०५२७७७१२, श्री.संकेत चंद्रमोरे-८८८८२९८७०८ |
| ५. | उपस्थितीचे ठिकाण | - | विभागीय क्रीडा संकुल परिसर, वसतिगृह इमारतीजवळ, हिरावाडी रोड, पंचवटी, नाशिक |
| ६. | निवास व भोजन व्यवस्था | - | |
| ७. | संघ व्यवस्थापक / प्रशिक्षक बैठक | - | दि.१७ जाने. २०२५ रोजी सायं. ०५.३० ते ०६.३० वा. इनडोअर हॉलमध्ये. |
| ८. | स्पर्धेस प्रत्यक्ष सुरुवात | - | दि. १८ जानेवारी, २०२५ रोजी,सकाळी –०८.०० वा.पासून सुरुवात. |
| ९ | संपर्क क्रमांक | - | श्री. संतोष देशमुख, संघटना प्रतिनिधी – ९८५०१६६८००.<br>श्री. संदीप बोरसे (स्पर्धा तांत्रिक प्रमुख संचालक) – ७७०९४१०३४७.<br>श्री. अजिंक्य दुधारे, क्रीडा मार्गदर्शक – ९८६०९७०००१. |
| १०. | वजनगट व खेळबाब १९ वर्ष – मुले- | - | -५२,-५८,-६२,-६६,-७१,-७७,-८४,-१३० किग्रॅ. ( GI, NOGI ) |
| | १९ वर्ष – मुली- | - | -४५, -४९, -५३, -५८, -६४, -७१, -९० किग्रॅ. ( GI, NOGI ) |

## (राज्यस्तरीय शालेय ग्रॅपलींग स्पर्धेमध्ये सहभागी खेळाडूंची विभागनिहाय संख्या )

| अ.क्र | स्पर्धेत सहभाग | १९ वर्ष | | | | संघ व्यवस्थापक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | | मुली | | | |
| | | GI | NOGI | GI | NOGI | | |
| १. | विभागनिहाय सहभाग | ०८ | ०८ | ०७ | ०७ | ०२ | ३२ |
| | एकूण :- | **०८** | **०८** | **०७** | **०७** | **०२** | **३२** |

**राज्यस्तरीय शालेय ग्रॅपलींग स्पर्धेबाबत महत्वाच्या सुचना :—**

१. - राज्यस्तरीय शालेय ग्रॅप्लींग क्रीडा स्पर्धा ह्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच ग्रॅप्लींग फेडरेशन ऑफ इंडिया व एस जी एफ आय च्या प्रचलित नियमानुसार आयोजित करण्यात येईल.

२. - राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आवश्यक गणवेश, किट, साहित्य इ. खेळाडूंनी सोबत आणावे.

३. - राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत वरील तक्त्यात नमुद सहभागी होणा-या खेळाडूंच्या संख्येनुसार अधिकृत प्रवेशिकेत नमुद खेळाडू व संघ व्यवस्थापकांना निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध केली जाईल.

४. - निवासासाठी प्रत्येक खेळाडू जवळ पुरेसे अंथरुण, पांघरुण,दैनंदिन वापराच्या वस्तू असणे आवश्यक आहे.

५. - खेळाडूंसोबत कोणत्याही मौल्यवान वस्तू / साहित्य बाळगू नये. वस्तुंची जबाबदारी आयोजन समिती स्वीकारणार नाही.

६. - राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उदघाटन व समारोप प्रसंगी विभागनिहाय खेळाडूंनी सहभागी असणे आवश्यक आहे.

७. - स्पर्धा आयोजनाबाबतचे सर्वाधिकार राज्यस्तर शालेय ग्रॅप्लींग स्पर्धा आयोजन समितीने राखून ठेवले आहेत.

८. - स्पर्धेत सहभागी होणा-या मुलींच्या संघाबरोबर महिला संघ-व्यवस्थापक असणे आवश्यक आहे. संघ व्यवस्थापकाकडून निवासस्थानी अनामत रक्कम रु. १,०००/- परताव्या स्वरुपात स्वीकारली जाईल. निवासाच्या ठिकाणी नुकसान व मोडतोड आढळून आल्यास अनामत रक्कमेतून योग्य ती नुकसान भरपाई व शाळेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

९. - स्पर्धास्थळी स्पर्धेदरम्यान जीवित वा वित्तहानी झाल्यास आयोजक व आयोजन समिती जबाबदार राहणार नाही.

१०. - राज्यस्तर शालेय ग्रॅप्लींग क्रीडा स्पर्धा आयोजन समितीमार्फत गठीत तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

११. - खेळाडूंसोबत संचालनालयाचे क्र.क्रीयुसे/एखेसं/स्पर्धा/वय/२०२२-२३/का.४,दि.२७.०४.२०२२ रोजीच्या पत्रानुसार पुढीलप्रमाणे कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. - *१. संबंधित खेळाडूचे वय **एक वर्षापर्यंत** असतांना संबंधित शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला* ***किंवा*** *२. संबंधित खेळाडूचे वय किमान **पाच वर्षापर्यंत** असतांना संबंधित शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला* ***किंवा*** *३. संबंधित खेळाडूच्या वयाची **पाच वर्ष पूर्ण** झाल्यानंतर संबंधित शासकीय विभागाचा जन्मदाखला असेल तर खेळाडूच्या पहिल्या इयत्तेतील प्रवेश घेतलेल्या जनरल रजिस्टरची सत्यप्रत अनिवार्य आहे. तसेच यावरील पैकी एका जन्म पुराव्यासोबत (आधारकार्ड, पासपोर्ट ) यापैकी एक कागद व **Eligibility Certificate-** ओळखपत्र मुळ तीन प्रतीत, मागील वर्षाची गुणपत्रिका, बोनाफाईड प्रमाणपत्र इ. असणे अनिवार्य आहे. तसेच Eligibility Certificate- ओळखपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित खेळाडूचा शालेय प्रवेश अर्ज, जन्मदाखला, पहिल्या इयत्तेतील जनरल रजि. मधील जन्मतारीख व आधारकार्ड तथा पासपोर्ट यामधील नमुद जन्म तारीख सारखीच असणे आवश्यक आहे. नसल्यास अशा खेळाडूस त्या वयोगटासाठी पात्र समजण्यात येणार नाही.*

१२. - विभागाचे प्रवेश अर्ज दि. १४ जानेवारी, २०२५ रोजी पर्यंत या कार्यालयाकडे पोस्टाने अथवा इ-मेल व्दारा dsonashik2013@gmail.com या मेलवर **PDF** व **WORD FILE** मध्ये पाठवावेत.

१३. - स्पर्धेस निघण्यापूर्वी खाली नमुद क्रमांकाशी संपर्क साधून स्पर्धा कार्यक्रम निश्चित असल्याची खात्री करावी.

| | |
|---|---|
| श्री.संतोष देशमुख - ९८५०१६६८०० | श्री. संदीप बोरसे — ७७०९४१०३४७. |
| श्री. अर्चना देशमुख - ८९७५८६६८०० | उमेश थोर — ७०८३८७०५२४. |
| श्री. अजिंक्य दुधारे, क्रीडा मार्गदर्शक — 9860970001 | |

वरील सर्व सुचनांचे अवलोकन करुन आपल्या विभागातील विजयी संघांना राज्यस्तरीय शालेय ग्रॅप्लींग क्रीडा स्पर्धेसाठी वेळेत उपस्थित राहण्याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात अशी विनंती आहे.

आपली विश्वासू

**( सुनंदा पाटील )**
जिल्हा क्रीडा अधिकारी
नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर :—

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद, नाशिक.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, नाशिक.
४. मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,**(मुख्यालय/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/कोल्हापूर/लातूर)**.

प्रत माहितीस्तव व सहकार्यास्तव : —

१. मा. सर्व जिल्हा क्रीडा परिषद सदस्य, जिल्हा क्रीडा परिषद, नाशिक.
२. मा. अध्यक्ष / सचिव ग्रॅप्लींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र — GAM.